सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

स्वागत मूल्य १ रु.

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : ६८ | मंगळवार, दि. २ डिसेंबर २०२५ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : १ रु. | Email - globalmahatej@gmail.com

## दिनविशेष
२ डिसेंबर

- गुलामगिरीच्या निर्मूलनासाठी आंतरराष्ट्रीय दिवस
- संगणक साक्षरता दिन
- प्रदूषण नियंत्रण दिन
- विश्वनाथ प्रताप सिंग यांनी भारताचे ७ वे पंतप्रधान म्हणून शपथ घेतली.
- 'सर नारायण गणेश चंदावरकर' कायदेपंडित, समाजसुधारक, मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश यांचा जन्म.
- 'इन्दर लाल रॉय' पहिल्या महायुद्धातील भारतीय पायलट यांचा जन्म.
- 'मनोहर जोशी' महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री यांचा जन्म.
- 'बोमन ईराणी' अभिनेते यांचा जन्म.
- 'धीरज पारसणा' भारतीय क्रिकेटपटू यांचा जन्म.
- 'सुजित सोमसुंदर' भारतीय क्रिकेटपटू यांचा जन्म.
- 'गेरहार्ट मरकेटर' नकाशाकार, गणितज्ञ आणि तत्त्वज्ञ यांचे निधन.
- 'ए आर अंतुले' महाराष्ट्राचे ८ वे मुख्यमंत्री यांचे निधन.




(छायाचित्र : मयुर चौधरी)

## मतदानाच्या दिवशी प्रचाराच्या जाहिरातींना बंदी!
### प्रसिद्धी माध्यमांच्या उत्पन्नात झाली घट

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- पालिका निवडणुकीसाठी निवडणूक आयोगाकडून मतदानाच्या दिवशी जाहिराती प्रसिद्धीस बंदी घातली आहे. यंदा मतदानाच्या २४ तास आधी अर्थात एक दिवस आधीपर्यंत प्रचाराची मुभा देण्यात आली होती. पूर्वी ही मर्यादा ४८ तासांची होती. या पार्श्वभूमीवर सोमवार, दि. १ डिसेंबर रोजी रात्री प्रचार तोफा थंडावल्या आहेत. मंगळवार, दि. २ डिसेंबर रोजी मतदान, तर बुधवार, दि. ३ डिसेंबर रोजी मतमोजणी होणार आहे. यामुळे विविध प्रसिद्धी माध्यमांच्या उत्पन्नात मात्र घट होणार आहे.

१ डिसेंबर रोजी रात्री १० वाजता प्रचाराची समाप्ती झाली आहे. यामुळे त्यानंतर प्रचाराच्या कुठल्याच जाहिराती प्रसिद्ध किंवा प्रसारित करता येणार नाहीत. त्यामुळे मतदानाच्या दिवशी म्हणजे २ डिसेंबर रोजी मुद्रित माध्यमांतही जाहिराती प्रसिद्ध करू नयेत, असे राज्य निवडणूक आयोगाने स्पष्ट केले आहे. नगरपरिषदा आणि नगरपंचायतीच्या निवडणुकांसाठी २ डिसेंबर रोजी मतदान होत आहे. त्यासाठीच्या जाहीर प्रचाराची मुदत १ डिसेंबर २०२५ रोजी रात्री १० वाजता संपली आहे. त्यानंतर प्रचारसभा, प्रचारफेऱ्या, ध्वनिक्षेपकाद्वारे जाहीर प्रचार करता येणार नाही, असे प्रशासनाने जाहिर केले आहे.

# विद्यार्थिनींच्या छेडखानीविरूद्ध ६ डिसेंबरला महाआंदोलन- मोर्चा
## दै. ग्लोबल महातेज व विविध संघटनांनी सोमवारी दिले निवेदन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- येथे विद्यार्थिनींची रोज होणारी छेडखानी, गुंडांचा हैदोस यामुळे काही अघटीत व अप्रिय घटना होऊ नये यासाठी वेळीच कायमस्वरूपी, ठोस, कठोर प्रतिबंधकात्मक कारवाई व्हावी, यासाठी सोमवार, दि. १ डिसेंबर रोजी सकाळी दै. ग्लोबल महातेज व विविध संघटनांच्या प्रतिनिधींनी पोलीस ठाण्यात पोलीस उपनिरीक्षक शरद काकळीज यांना निवेदन दिले. दरम्यान, छेडखानीविरूद्धचा हा शहराच्या इतिहासातील सर्वात प्रखर व प्रथम एल्गार आहे.



अमळनेर- विद्यार्थिनींच्या छेडखानीविरूद्ध ६ डिसेंबरला निघणाऱ्या नियोजीत मोर्चाबाबत निवेदन देताना विविध संघटनांचे पदाधिकारी व सदस्य.

निवेदनात म्हटले आहे, की हल्ली शहरातील सर्वात ज्वलंत समस्या म्हणजे शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थिनींना समाजकंटक व गुंड प्रवृत्तीच्या तरुणांकडून होणारा असहनीय व संतापजनक त्रास होय...!

या त्रासामुळे अनेक विद्यार्थिनींना त्यांचे जीवन नकोसे झाले आहे. काही विद्यार्थिनींनी तर शिक्षणच बंद केले आहे. अनेक विद्यार्थिनींच्या पालकांनी विद्यार्थिनींचे शिक्षण बंद करून त्यांचे जड अंतःकरणाने लवकर लग्न लावून दिले आहेत. आपण या अनुषंगाने काही कारवायाही केल्या आहेत. मात्र एवढ्याने हे सारे काही गैरप्रकार थांबले नाहीत. सदर गैरप्रकार थांबावेत, यासाठी आपल्या स्तरावरून कायमस्वरूपी ठोस व कठोर कारवाई होणे गरजेचे आहे.

सदर ज्वलंत समस्येकडे आपल्यासह संबंधित सर्वच यंत्रणांचे लक्ष वेधण्यासाठी आम्ही एका मोठ्या जनआंदोलनाची तयारी केली आहे . आपल्या मुलींनी जीवाचे काही बरे वाईट करून घेऊ नये किंवा एखाद्या गुंडाने तिला भर रस्त्यावर संपवू नये, त्यांचे जीवन उद्ध्वस्त होऊ नये यासाठी आम्ही सर्वांनी एकत्रित येऊन नाईलाजास्तव मोर्चा स्वरूपात मोठे जनआंदोलन करणे निश्चित केले आहे. शहराच्या तुलनेने येथील पोलिसांची संख्या कमी आहे. त्यामुळे आपणास कदाचित इच्छा असूनही सदर गैरप्रकारंबाबत नियमितपणे कारवाई करणे अशक्य झाले आहे. हे प्रशासनिक कारण असले तरी त्यासाठी आम्ही आपल्या मुलींचे जीव, शिक्षण व करिअर धोक्यात घालू शकत नाही.

समाजकंटक आणि गुंडांचा कायमस्वरूपी बंदोबस्त करण्यासाठी आपल्या मुलींना कायमस्वरूपी सुरक्षा लाभणे गरजेचे आहे. त्यासाठी आपणास नम्र विनंती की, आपण आम्ही आयोजित केलेल्या जनआंदोलनासाठीच्या आयोजन व नियोजना पाठीमागील शुद्ध व सकारात्मक हेतू समजून घ्यावा. गुंडांचा तथा समाजकंटकांचा त्वरित कडक बंदोबस्त करावा व आमच्या मोर्चासही सर्वतोपरी सहकार्य करावे, ही विनंती.

दरम्यान, सदर मोर्चा साने गुरुजी शाळा, धुळे रोड येथून शनिवार, दि. ६ डिसेंबर २०२५ दुपारी ३.०० वाजता निघून प्रांताधिकारी कार्यालयावर जाणार आहे. तेथे पोलीसांसह प्रांताधिकारी व तहसीलदारांना मोर्चेकरी निवेदन देतील. मोर्चात मुलींच्या सर्व शाळा, सर्व महाविद्यालयातील विद्यार्थिनी, सर्व खासगी क्लासेसमधील विद्यार्थिनी, सर्व महिला मंडळे व सेवाभावी संस्था सहभागी होणार आहेत.

निवेदन देताना मराठी वाङमय मंडळाचे अध्यक्ष डॉ. अविनाश जोशी, अमळनेर शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव संदीप घोरपडे, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष बी. के. सूर्यवंशी, रोटरी क्बलचे अध्यक्ष देवेंद्र कोठारी रोटरी क्लबचे सचिव आशिष चौधरी, रोहित सिंघवी, राजेश बेदमुथा, ताहा बुकवाला, खासगी कोचिंग क्लासेस संघटनेचे अध्यक्ष ॲड. भय्यासाहेब मगर, स्वादिष्ट नमकिनचे संचालक विजय पाटील, नीलेश पाटील, क्रीडा शिक्षक सुनील वाघ, गजेंद्र साळुंखे, सौ. रत्नमाला सोनवणे, मंगळ ग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले, उपाध्यक्ष एस. एन. पाटील, सचिव सुरेश बाविस्कर, सहसचिव दिलीप बहिरम, कोशाध्यक्ष गिरीश कुळकर्णी, विश्वस्त अनिल अहिरराव व डी. ए. सोनवणे, व्ही. व्ही. पाटील, योगेश पाटील, पुश्चंद ढाके, रजनीकांत पाटील, शरद कुळकर्णी आदी उपस्थित होते.

### गुंडांना सक्तीने निपटले जाईल!

शहरात मुली, विद्यार्थिनी व महिलांची कोठे, कशी व कोण छेडखानी करतात याबाबत तसेच ६ डिसेंबरला मोर्चा का काढावा लागतो आहे ? याबाबत डॉ. डिगंबर महाले यांनी पोलीस उपनिरीक्षक शरद काकळीज यांना अत्यंत संतापजनक सविस्तर माहिती दिली. त्यावर श्री. काकळीज यांनी गुंडांना सक्तीने निपटले जाईल. त्यांना कठोर शिक्षा केली जाईल, असे उपस्थितांना अभीवचन दिले.

### गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

**स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!**

**निवडणूक प्रचारामुळे विविध व्यावसायिकांना अच्छे दिन!**



पान ३ ...

## स्कूल बसचा रंग पिवळाच का असतो ? ९९ टक्के लोकांना माहीत नाही खरे कारण

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

शाळेत जाणाऱ्या प्रत्येक मुलाच्या पालकाच्या आयुष्यातील स्कूल बस हा अविभाज्य घटक बनला आहे. अनेकदा व्यस्त जीवनशैलीमुळे पालकांना आपल्या मुलांना शाळेत स्वतः सोडता येत नाही. अशा परिस्थितीमध्ये ते स्कूल बसवरच अवलंबून असतात. सध्याची जीवनशैली ही खूप व्यस्त आहे. जर पती- पत्नी दोघेही नोकरी करत असतील तर त्यांचे आपल्या पाल्याकडे दुर्लक्ष होण्याची शक्यता असते. आपल्या पाल्याला ते स्वतः शाळेत सोडायला जाऊ शकत नाहीत. अशावेळी त्यांना स्कूल बस हाच खूप मोठा आधार असतो. स्कूल बस मुलांना आपल्या घरातून शाळेत सोडण्याचे काम करते आणि पुन्हा शाळेतून घरी आणण्याचे काम करते. मुलांसाठी एक सुरक्षित प्रवासाचे साधन म्हणून स्कूल बसकडे पाहिले जाते. मुलाला शाळेत जाण्यासाठी स्कूल बस लावल्यास पालकांची देखील मोठी चिंता दूर होते. मुलांना शाळेत सोडण्यासाठी किंवा आणण्यासाठी शाळेत जाण्याचे टेन्शन राहत नाही. मात्र, तुम्ही कधी हा विचार केला आहे का की स्कूल बसचा रंग पिवळाच का असतो?

स्कूल बसचा रंग पिवळा का असतो? या मागे देखील एक खास विज्ञान आहे. कारण पिवळ्या रंगांची वेव्हलेंथ ही खूप जास्त असते, ती लाल रंगापेक्षा जास्त असते. त्यामुळे पिवळा रंग हा खूप दूरवरून देखील स्पष्ट दिसतो. त्यामुळे अनेक ठिकाणी धोका दाखवण्यासाठी पिवळ्या रंगाचा वापर करतात. दरम्यान स्कूल बसमध्ये लहान मुले असतात. ते शाळेत सुरक्षितरित्या पोहोचविण्याची जबाबदारी चालकावर असते. त्यामुळे रस्त्यात कुठे अपघात होऊ नये, समोरच्या व्यक्तीला स्कूल बस स्पष्ट दिसावी यासाठी देखील स्कूल बसचा रंग हा पिवळा असतो.

सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे आता पिवळा रंग हा सामान्य झाला आहे. तो स्कूल बसची ओळख बनला आहे. वाहनाचा पिवळा रंग बघताच ही स्कूल बस आहे, हे लगेचच समोरच्या चालकाच्या लक्षात येते. अशा परिस्थितीमध्ये त्याने वाहनाचा वेग कमी करणे अपेक्षित असते. त्यामुळे स्कूल बसचा प्रवास हा सुरक्षित होतो. त्यामुळे स्कूल बसचा रंग हा नेहमी पिवळाच असतो.




## यंदाच्या पालिका निवडणुकीचे काही आगळे-वेगळे रंग!
### अनिलदादा होणार अनभिषिक्त सम्राट की शिरीषदादांना फुटेल नवी पालवी?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- हल्ली प्रत्येक क्षेत्रातील राजकारण अत्यंत चुरशीचे व खर्चाचे असते. प्रत्येक निवडणुकीच्या निकालातून अनेकांचा कायमचा निकाल लागतो. याच पार्श्वभूमीवर यंदाची पालिका निवडणूक आमदार अनिलदादा पाटील यांच्यासाठी अत्यंत प्रतिष्ठेची आहे. तर माजी आमदार शिरीषदादा चौधरी यांच्यासाठी जणू ' अभी नही... तो कभी नही...! ' अशाच स्वरूपाची जणू ही निवडणूक आहे.

पालिका ताब्यात आल्यास अनिलदादाच राजकीय अनभिषिक्त सम्राट ठरतील. तर शिवसेनेचा नगराध्यक्ष विजयी झाल्यास शिरीषदादांची राजकीय ताकद मोठ्या प्रमाणावर वाढेल. शिवसेनेतही त्यांचा मान वाढेल. त्यामुळे आगामी काळात सर्वच क्षेत्रातील सत्ता संघर्ष अधिक विकोपाला जातील. त्यामुळे अनिलदादा यांना आता शिरीषदादांना रोखणे अत्यावश्यक झाले आहे. कारण ' अभी नही रोका तो आगे सरदर्द पक्का है' अशी स्थिती होणार आहे. मात्र, शिरीषदादांना अपयश आल्यास पक्ष पातळीत त्यांची पिछेहाट तर होईलच शिवाय अमळनेरच्या राजकारणात त्यांना नव्याने पालवी फुटणे महामुश्किल होईल.




नगराध्यक्षपद अनुसूचित जमातीसाठी आरक्षीत असल्याने या निवडणुकीत यशप्राप्तीसाठी जाती- पातीचे राजकारण करायला फारसा वावच मिळाला नाही. अन्यथा सर्वच निवडणुकांमध्ये जात आणि धर्म हे घटक अत्यंत महत्वपूर्ण मानले जातात. अनेकांच्या मते विधानसभा निवडणुकीप्रमाणेच या निवडणुकीतही व्हिटॅमिन एमचे हेवी डोस देऊन हमखास यशप्राप्ती केली जाईल, हा अंदाज मात्र काहीसा चुकला आहे. पैशाची चटक लागलेल्यांना पाहिजे तितके पैसे मिळाले नाहीत, अशी त्यांची खंत (?) आहे.

नगरसेवकपदाचे उमेदवार एक-एक मतासाठी जिवाचे रान करीत आहेत. अनेकांनी राज्यातुनच नव्हे, तर देशभरात जेथे- जेथे त्यांचे मतदार नोकरी व्यावसायानिमित्त गेले आहेत तेथून वाटेल ती किंमत मोजून त्यांना मतदानासाठी बोलाविले आहे. त्याचवेळी नेहमीप्रमाणे काही उदासिन मतदारांना मतदानाचे कोणतेही महत्व किंवा कौतुक नाही. काहींनी आम्हाला आता अतिभ्रष्ट आणि घाणेरड्या राजकारणाचा विट आला आहे. त्यापेक्षा मतदानाला जाणेच नको, अशी त्रस्त भुमिका घेतली आहे. काही मतदार तर २ डिसेंबरला पगारी सुटी जाहीर झाल्याने १ डिसेंबरची रजा टाकून ' निवडणूक गेली तेल लावायला ' असे म्हणत रविवार, सोमवार व मंगळवार अशा तीन दिवसांच्या ट्रीपवर निघून गेले आहेत.

मरता क्या नही करता अशी एक म्हण आहे. सर्व उमेदवार विजयासाठी साम, दाम, दंड भेदाच्या पलिकडे जाऊनही अनेक उपाययोजना करत आहेत. त्यात विविध प्रकारच्या देवपूजा, होम- हवन, नवस इतकेच नव्हे तर बुवा- बाबा, अघोरी यांच्या माध्यमातून छु- छा वाल्या काळ्या जादुचाही प्रयोग करीत असल्याचे कळते.

सर्वसाधारणपणे लोकसभा, विधानसभा व पालिका, जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांचे जाहीरनामे मतदानाच्या किमान एक आठवड्यापूर्वी प्रसिद्ध केले जातात. यावेळी येथील पालिका निवडणुकीच्या रिंगणात असलेली शहर विकास आघाडी व शिवसेनेने केवळ दोन दिवस आधी जाहीरनामे (वचननामे) सिमित स्वरूपात प्रसिद्ध केले आहेत. ऐनवेळेच्या या जाहीरनाम्यांना काही अर्थ उरतो की फक्त 'अर्थालाच' जास्त अर्थ प्राप्त होतो, हे ३ डिसेंबरला कळेलच.

# मसाला पान



# एकही अभिनेत्री नसलेला चित्रपट! फक्त २० कोटींचे बजेट

## कमावले तब्बल २४० कोटी, वीकेंडला ओटीटीवर पाहा ' हा ' सिनेमा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

चित्रपट म्हटले की हिरो आणि हिरोईन आलेच. पण २०२४ मध्ये एक असा चित्रपट रिलीज झाला, ज्यात एकही अभिनेत्री नव्हती. तरीही या चित्रपटाने बॉक्स ऑफिस गाजवले होते. या चित्रपटाचे नाव ' मंजुम्मेल बॉईज. ' हा मल्याळम चित्रपट आहे. समीक्षकांसह प्रेक्षकांनीही या चित्रपटाचे प्रचंड कौतुक केले होते. ' मंजुम्मेल बॉईज ' या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर जबरदस्त कमाई केली होती.

आपल्याला विश्वास बसणार नाही. पण अवघ्या २० कोटींच्या बजेटमध्ये तयार केलेल्या ' मंजुम्मेल बॉईज ' या चित्रपटाने तब्बल २४० कोटी रुपये कमावले. ' मंजुम्मेल बॉईज ' २२ फेब्रुवारी २०२४ रोजी सिनेमागृहांमध्ये प्रदर्शित झाला होता. सत्य घटनेवर आधारित या चित्रपटाने जवळपास दीड महिना बॉक्स ऑफिस गाजवले होते.





### ' मंजुम्मेल बॉईज 'ची कथा

' मंजुम्मेल बॉईज ' या चित्रपटाने सिनेमागृहांमध्ये आपल्या बजेटच्या १२ पट जास्त कमाई केली होती. ' मंजुम्मेल बॉईज ' या चित्रपटात एकही अभिनेत्री नाही. ' मंजुम्मेल बॉईज ' हा चित्रपट एका सत्य घटनेवर आधारित आहे. हा चित्रपट मित्रांच्या एका ग्रुपवर आधारित आहे. या चित्रपटात काही मित्र कोडाईकनलमध्ये सुट्ट्या घालवायला जातात. तेथे त्यांच्यासमोर एक आव्हान येते, त्याचा ते सर्वजण कसा सामना करतात यावर सिनेमा बेतलेला आहे. चित्रपटाची कथा खूपच मजेदार आणि भावनिक आहे.

### ' मंजुम्मेल बॉईज 'मधील कलाकार

चित्रपटातील कलाकारांबद्दल बोलायचे झाल्यास यात शोबिन शाहीर, श्रीनाथ भासी, बालू वर्गीस, गणपती एस. पोडुवल, लाल ज्युनियर, दीपक परंबोल, अभिराम राधाकृष्णन, अरुण कुरियन, खालिद रहमान, चंदू सलीम कुमार आणि विष्णू रेघू महत्त्वाच्या भूमिकेत आहेत. चित्रपटाची कथा आणि दिग्दर्शन चिदंबरम यांचे आहे.

### कुठे पाहायचा ' मंजुम्मेल बॉईज '?

' मंजुम्मेल बॉईज ' या चित्रपटातील कलाकार व कथा दोन्हीचे खूप कौतुक झाले होते. तुम्ही हा चित्रपट थिएटर पाहिला नसेल तर तो घरबसल्या पाहू शकतात. ' मंजुम्मेल बॉईज ' जिओ हॉटस्टार या ओटीटी प्लॅटफॉर्मवर उपलब्ध आहे. या वीकेंडला तुमचा काहीच प्लॅन नसेल आणि ओटीटीवर चांगले काही पाहायचा विचार करत असाल तर ' मंजुम्मेल बॉईज ' पाहू शकता.

# वांगे आणि औषधी.. काय पण सांगताय का राव...?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



वांग्यांबद्दलची माहिती ऐकल्यावर ' काय राव, सांगता वांगे एवढे औषधी असते होय?' असा एक साधा प्रश्न गावाकडच्या माणसाने मला विचारला. वांग्याचे भरीत तुम्ही खाल्ले का हो? आम्ही अजून मधून-मधून वांग्याचे भरीत आवडीने खातो व भरीत करायला तर एकदमच सोपे. विशेषतः चुलीवर तयार केलेल्या म्हणजेच भाजून तयार केलेले खूपच उत्कृष्ट लागते. वांगे हे खूपच पौष्टिक आहे. भाजी करताना वांगे हे खूप कच्चे नसावे व खूप पिकलेलेही नसावेत, ज्याच्यात परिपक्व असा आहे, पूर्ण असे विकसित झालेले वापरावे. लहान वांगे हे पित्त व कफ कमी करते. मोठे वांगे पचायला हलके असले तरी थोडे पित्तकर आहे. वांगे खायचे झाल्यास डोरली वांगे, कोंबडीच्या अंड्यासारखे असणारे पांढरे वांगे, काटेरी वांगे व गावरान अशा काही जाती आहेत तेच खावे, असे आमचे आग्रहाचे सांगणे आहे. वांग्याचे एवढे औषधी उपयोग आहेत हे बऱ्याच जणांना माहिती नाही. गावाकडील लहानपणाचे दिवस मला अजूनही आठवतात. लग्नामध्ये किंवा कार्यामध्ये, पळसाच्या पत्रावळीमध्ये वांगे-चवळीची भाजी, डाळ, भात, घरी तयार केलेले एखादे आंबट लोणचे खाल्ले की समाधानाची ढेकर सुटते. असे आमच्या लेखाने, वांग्याबद्दलचे काही गैरसमज सोडले जातील व वांग्याची भाजी घरोघरी आवडीने खाल्ली जाईल, एवढी ही गुणी आहे. आपण आपल्या गच्चीवर किंवा कुंडीमध्ये वांग्याचे झाड लावू शकता.

### १) वांग्याचे भरीत

वांगे हे चांगले धुऊन घ्यावे. चुलीवर किंवा गॅसवर चांगले भाजावे. वरची जळलेली साल काढून टाकावी. त्यानंतर त्यामध्ये मिरपूड, हिंग, सैंधव टाकून चांगले घोटावे व ज्वारीच्या भाकरीबरोबर खावे. भरितामध्ये तेल कधीही टाकू नये. टाकले तर पचायला खूपच जड होते. अन्नाचे त्यांनी चांगले पचन होते, भूकही छान लागते, भरतासाठी डोरले वांगे भेटल्यास एकदम उत्तम. माझ्याकडे येणाऱ्या दोन प्रकारच्या रुग्णांना मी भरीत खायला सांगतो. ज्यांना झोप लागत नाही त्यांनीही रात्री खावे, तसेच बऱ्याच जणांची सारखे पोट दुखत असते, पोट फुगले की मग हृदयावर दाब पडतो. मग कसेतरी होते, अस्वस्थ होते. अशी लक्षणे जाणवतात. त्यांना हा भरिताचा प्रयोग छान लागू करतो. मात्र यासाठी डोरले वांगे, जासे दशमुळात ' बहती ' असे म्हणतात. ते भेटल्यास चांगले, " भाव प्रकाश ' नावाच्या ग्रंथात याचे खूप छान वर्णन केलेले आहे. ग्रंथात सर्व गोष्टी सांगितलेल्या असतात. त्यासाठी ग्रंथाचे सतत वाचन गरजेचे असते.

### २) ताप-खोकला

तापामध्ये ही भाजी जरूर खावी. काही जण वांग्याच्या बिया काढूनही भाजी करतात. तापात तोंडी लावण्यासाठी ही भाजी उत्तम आहे. तोंडास चांगली रुची येते. शरीरातील कफ कमी होऊन आम कमी होतो. तापात ताजी वांगी वाफवून करावेत. त्यात चवीसाठी सैंधव व आले टाकावे. खूप छान भाजी होते. घरातील कुणी आजारी असल्यास जरूर करून बघा. लाल तिखट टाकू नये. वाफवून भाजी केल्यास छान लागते. तांदूळ भाजून केलेला मऊ भात व वांग्याची भाजी ताप-खोकल्यामध्ये उत्तम आराम देणारी योजना आहे.

### ३) मूळव्याध

मूळव्याधीच्या लोकांनी पांढरे वांगे खावे. काहींनी वांगी भाजून ते फडक्यात बांधून त्याने ही जागा शेकावी. मात्र ते अतिशय काळजीपूर्वक करावे.

### ४) झोप येण्यासाठी

झोप येण्यासाठी वांगे खूपच फायदेशीर ठरते. वांग्यांच्या पानांचा रस दोन चमचे खडीसाखरेसह घेतल्यास उत्तम झोप लागते. तसेच वांग्याचे भरीत खावे. त्याने छान आराम पडतो.

### ५) वजनदार व्यक्तींसाठी

काही लोकांचे शरीर हे फुगते. त्यांच्यामध्ये मेद खूपच वाढलेला असतो. त्यांनी अधून-मधून वांग्याची भाजी जरूर खावी. अशक्त माणसांनीही भाजी खाल्ल्यास थोड्या दिवसांत शक्ती आल्यासारखे वाटेल. गाठीवर वांगे भाजून लावण्याची काही ठिकाणी पद्धत आहे. अशक्तपणावर वांग्याची भाजी ही खूपच चांगली आहे. त्यामुळेच त्याचा आहारात समावेश करत जावा. वांगे हे शुक्रधातू वाढविणारे आहे. त्यामुळे ते भोजनात अधून-मधून जरूर खावे. वांगे खूपच स्वादिष्ट व पौष्टिक आहे.

**सक्सेस स्टोरी**

# बार-बार फेल होकर भी नहीं मानी हार, इसे कहते है डर के आगे जीत है।

## एआयआर-६२ लाकर यूपीएससी टॉपर बनी गोंडा की बेटी



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

कई बार एक छोटी-सी लाइन, कुछ शब्द या फिर एक वाक्य... हमारे जीवन बड़ा बदलाव ला सकता है। 'पल भर की सफलता जीवन भर के संघर्ष को भुला देती है'...ऐसी ही एक लाइन है जिसने वो सपना पूरा कराया जिसे लाखों युवा देखते हैं। आज की यह कहानी है वैष्णवी पॉल की। जिन्होंने बचपन में पढ़े हुए शब्द तो याद रखे, पर उनका असली मतलब तब समझा जब संघर्ष की असली राह पर कदम रखा। आइए उनकी सक्सेस स्टोरी में जानें कैसे उन्होंने मेहनत, धैर्य और विश्वास के ५ साल के बाद आयएएस बनने का सपना सच किया।

### बचपन में खुद से कर लिया था वादा

एक इंटरव्यू में वैष्णवी बताती है कि उन्होंने बचपन में ही खुद से आयएएस बनने का वादा कर लिया था। इसके लिए उन्होंने दिन-रात मेहनत की। उनकी मां टीचर हैं और उन्हीं से मिली प्रेरणा ने वैष्णवी को हर मुश्किल का सामना करने का हौसला दिया। वैष्णवी हमेशा पढ़ाई को सबसे ज्यादा महत्व देती थीं और बचपन से अखबार पढ़ने की आदत ने उनकी सोच को और मजबूत बनाया।

### बैचलर्स और मास्टर्स की पढ़ाई यहां से

वैष्णवी ने इंटर तक की पढ़ाई गोंडा जिले के फातिमा स्कूल से कंप्लीट की थी। इसके बाद वह दिल्ली आ गईं और दिल्ली यूनिवर्सिटी के लेडी श्री राम कॉलेज से अर्थशास्त्र में ग्रेजुएशन कंप्लीट किया। मास्टर्स की डिग्री के लिए वह जवाहरलाल नेहरू विश्वविद्यालय गईं। इसके बाद उन्होंने यूपीएससी की तैयारी शुरू कर दी।

### बार-बार फेल पर पूरा ही करना था यूपीएससी का सपना

यूपीएससी के पहले अटेंप्ट में वैष्णवी को सफलता नहीं मिली लेकिन वह आगे बढ़ती रहीं। दूसरे प्रयास में भी वह असफल हो गईं। तीसरी बार यूपीएससी की परीक्षा में बैठीं लेकिन असफलता ही मिली। वह बताती हैं कि जब 3 बार यूपीएससी में सक्सेस नहीं मिली तो बुरा लगा लेकिन वह फिर से तैयारी में जुट गईं। २०२२ में वह ऑल इंडिया रैंक-६२ लाकर यूपीएससी टॉपर बनीं।

### डीएम की एसपी से नहींइंटरव्यू में हुआ कुछ ऐसा

आयएएस इंटरव्यू के दौरान उनसे एक खास सवाल पूछा गया था। 'अगर आप नई डीएम हों और पिछली डीएम की एसपी से नहीं बनती थी तो आप क्या करेंगी?' तो इसका जवाब उन्होंने आत्मविश्वास से देकर कहा कि मैं सकारात्मक सोच के साथ शुरुआत करुंगी और आपसी तालमेल पर ध्यान दूंगी।

### कैलेंडर की लाइनजिसने हमेशा किया मोटिवेट

वैष्णवी की इंस्टाग्राम पोस्ट भावुक करने वाली है। उसमें लिखा है कि'पल भर की सफलता जीवन भर के संघर्ष को भुला देती है' ये वो लाइनें थीं जो मैंने ११ साल की उम्र में अपने पापा की दुकान पर रखे एक रैंडम कैलेंडर पर पढ़ी थीं। मुझे मुश्किल से ही समझ आया कि इसमें जिस स्ट्रगल और सक्सेस की बात हो रही थी, उसका क्या मतलब है। भले ही मैं इसके मतलब की गहराई का अंदाजा नहीं लगा सका, लेकिन यह लाइन मेरे दिमाग में हमेशा के लिए बस गई। ५ साल और चार कोशिशों में उतार-चढ़ाव मुश्किल सफर था। आज, जब मुझे आयएएस ऑफिसर के तौर पर अपॉइंटमेंट का मेल मिला तो मेरा मन ११ साल में वापस चला गया। यह खुशी का पल था जिसने मुझे पांच लंबे सालों तक बहाए गए सारे पसीने और आंसुओं को भुला दिया।

# संविधान दिवस साजरा करण्यासाठी २६ नोव्हेंबर हीच तारीख का निवडली?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**




भारताचे संविधान तयार करण्यासाठी एकूण २ वर्षे ११ महिने आणि १८ दिवस एवढा कालावधी लागला. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी आपले संपूर्ण संविधान बनून तयार झाले. २०१५ पासून देशभरात २६ नोव्हेंबर हा दिवस संविधान दिन म्हणून साजरा केला जातो.

### संविधान दिवस का साजरा केला जातो?

देशभरात संविधान दिवस साजरा केला जातो. दरवर्षी २६ नोव्हेंबर हा दिवस संविधान दिवस म्हणून ओळखला जातो. कारण १९४९ मध्ये याच दिवशी भारताच्या संविधान सभेने अधिकृतरीत्या भारतीय संविधान होते. त्यामुळे दरवर्षी हा दिवस संविधान दिन म्हणून साजरा केला जातो. २०१५ मध्ये संविधान निर्माते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती वर्षानिमित्त संविधान दिवस साजरा करण्यास सुरूवात झाली. नागरिकांमध्ये संवैधानिक मूल्यांविषयी आदर आणि जागरूकता वाढविणे, ही संविधान दिवस साजरा करण्यामागची मुख्य भावना आहे. २६ नोव्हेंबर २०१५ रोजी समाजकल्याण आणि अधिकारिता मंत्रालयाने केंद्र सरकारच्या निर्णयानुसार संविधान दिवस साजरा करण्याची अधिसूचना जारी केली.

### संविधान दिवस साजरा करण्याची सुरूवात कधी झाली?

प्रत्येक वर्षी २६ नोव्हेंबर रोजी संविधान दिवस साजरा केला जातो. त्याचे कारण म्हणजे २६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारताने आपले संविधान अधिकृतरीत्या स्वीकारले गेले. २०१५ मध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संविधान दिवस साजरा करण्यास प्रारंभ केला. याचा उद्देश नागरिकांमध्ये संविधानाबद्दल जाण, जागृती आणि आदर निर्माण करणे हा आहे.




### संविधानाने आपल्याला काय दिले?

२६ नोव्हेंबर हा प्रत्येक भारतीयासाठी अभिमानाचा दिवस आहे. याच दिवशी भारतात असे एक पुस्तक तयार झाले ज्याने प्रत्येक भारतीयाला समतेचा, स्वतंत्रपणे जगण्याचा, स्वतःचे निर्णय स्वतः घेण्याचा अधिकार दिला. संविधान तयार करण्यासाठी दिवस-रात्र मेहनत करण्यात आली. जेणेकरून कुणाच्याही अधिकाराला तडा जाऊ नये. संविधानाच्या प्रत्येक कलमावर आणि प्रत्येक तरतुदीवर जवळजवळ तीन वर्षे चर्चा, वादविवाद, तर्कवितर्क करण्यात आले. भारत विविधतेने नटलेला देश आहे. येथे धर्म, पंथ, जात, भाषा आणि विचारसरणी यांची प्रचंड विविधता आहे. अशा परिस्थितीत सर्वांना समान न्याय आणि समान हक्क देणारे संविधान बनविणे हे मोठे आणि कठीण काम होते. मात्र सदर काम घटनाकारांनी यशस्वी केले.

### भारताचे संविधान कसे तयार झाले?

भारताचे संविधान तयार होण्यासाठी २ वर्षे ११ महिने आणि १८ दिवस इतका दीर्घ कालावधी लागला. अखेर २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान पूर्ण स्वरूपात तयार झाले. भारतीय संविधान हे जगातील सर्वांत मोठे लिखित संविधान मानले जाते. संविधान तयार करताना अनेक प्रगत देशांच्या संविधानांचा अभ्यास करण्यात आला. जेणेकरून भारतीयांच्या जीवनात आधुनिक, योग्य आणि लोकशाही मूल्यांची अंमलबजावणी करता येईल. ज्या देशांच्या संविधानांचा आधार घेतला गेला त्यामध्ये अमेरिका, आयर्लंड, कॅनडा, जपान, ऑस्ट्रेलिया, युनायटेड किंगडम या देशांच्या संविधानांमधून भारताने मूलभूत अधिकार, कर्तव्ये, शासनव्यवस्था, पंतप्रधान, राष्ट्रपती, राज्यपाल यांची भूमिका, निवडणूक प्रक्रिया, अशा अनेक महत्त्वाच्या बाबी आत्मसात केल्या.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

# निवडणूक प्रचारामुळे विविध व्यावसायिकांना अच्छे दिन!

## भविष्यात उमेदवारांना होवो अथवा ना होवो इतरांना झाला फायदा!



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : पालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरात प्रचाराची रणधुमाळीत विविध व्यावसायिकांना किमान काही दिवसांसाठी अच्छे दिन आल्याचे दिसते. त्यात रिक्षाचालक, डिजिटल बोर्ड प्रिंटर्स, छापखाना व्यावसायिक, ढोल- ताशे वादक, हॉटेल व ढाबा मालक, व्हेज- नॉनव्हेज बनविणारे कारागीर व त्यांचे सहकारी, चहा, कॉफी व्यावसायिक तसेच अनेक बेरोजगारांनाही लाभ होत आहे. उमेदवारांकडून या सर्वच व्यावसायिकांना मोठ्या प्रमाणात व्यवसाय मिळाला आहे.

दरम्यान, मतदारांना मतदान केंद्रापर्यंत ने-आण करण्यासाठी अनेक उमेदवारांनी मोठ्या प्रमाणावर अनेक दिवसांपासून रिक्षा बुक करून ठेवल्या आहेत. प्रचारासाठी स्पीकर लावून रिक्षातून मतदानासाठी जाहीर आवाहन केले गेले. त्यात खूप मोठ्या प्रमाणावर रिक्षांचा वापर झाला. एरव्ही प्रवाशांची तासन्तास वाट पाहणाऱ्या रिक्षा चालकांनी वाढीव दराने उमेदवारांना रिक्षा भाड्याने दिल्या. त्यामुळे अन्य व्यावसायिकांच्या तुलनेने रिक्षाचालकांना चांगली कमाई झाली आहे. शिवाय प्रचारासाठी एक दिवस वाढवून मिळाल्याने रिक्षा चालकांच्या कमाईत आणखी वाढ झाली आहे.

दरम्यान, प्रत्येक उमेदवाराने व पक्षांनी शहरात मोठ्या प्रमाणावर डिजिटल बॅनर्स लावले आहेत. त्यांची छपाई करणारे व्यावसायिक तसेच सदर बॅनर्स वेगवेगळ्या ठिकाणी लावणारा मजुर वर्ग यांची चांगलीच कमाई झाली आहे. प्रत्येक उमेदवाराने मोठ्या प्रमाणावर पॉम्प्लेट्स वाटल्या आहेत. त्यामुळे छपाई व्यावसायिकांनी चांगलीच छपाई केली आहे. एरव्ही लग्न व अन्य समारंभातच मागणी असलेले ढोल- ताशे वादक रोजच कुठे ना कुठे बुक होते. त्यांनाही चांगला मेहनताना मिळाला आहे. सर्वच वयोगटातील अनेक बेरोजगार स्त्री- पुरूषांनाही प्रचार फेरीत सहभागी होण्यासाठी चांगले मानधन तसेच चहा, नाश्ता व भोजन मिळाले आहे. एकूणच पालिका निवडणुकीमुळे भविष्यात ज्यांना राजकीय फायदा होणार असेल त्यांना होईलही. मात्र, निवडणुकीच्या रणधुमाळीत अनेकांना वेगवेगळ्या पद्धतीने कमी अधिक प्रमाणात फायदा झाला, इतके मात्र निश्चित!

# मतदारांना मतदान केंद्रावर मोबाईल नेण्यास बंदी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- पालिका निवडणुकीसाठी मंगळवार, दि. २ डिसेंबर रोजी मतदान होणार आहे. प्रशासनाकडून मतदारांसाठी नियमावली तयार करण्यात आली आहे. मतदान केंद्राच्या १०० मीटर परिसरात मोबाइल वापरण्यास बंदी आहे. सध्याच्या काळात मोबाइलशिवाय घराबाहेर पडणे अनेकांना अशक्यच वाटते. मात्र, मतदारांना मतदान केंद्राबाहेरच मोबाइल ठेवावा लागणार आहे. अनेक मतदार मतदानासाठी येताना गोंधळतात. केंद्रात मोबाइल नेण्यास मज्जाव असल्याने मोबाइल कुठे ठेवायचा, कोणाकडे द्यायचा, या प्रश्नामुळे काही नागरिक मतदानालाच येत नाहीत, अशी माहिती निवडणूक अधिकाऱ्यांनी दिली. काही मतदार मात्र नियम मोडून चोरून मोबाइल केंद्रात नेतात आणि मतदानाचे फोटो-व्हिडीओ काढतात. हा गंभीर गुन्हा मानला जातो. मतदान प्रक्रियेची गुप्तता राखणे ही निवडणूक आयोगाची प्राथमिकता आहे. उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाईची तरतूद आहे. मतदानासाठी शहरात ९७ मतदान केंद्रांची स्थापना करण्यात आली आहे.

### प्रवेश करताना तपासणी

मतदान केंद्राच्या प्रवेशद्वारावर पोलिस आणि निवडणूक कर्मचाऱ्यांकडून काटेकोर तपासणी केली जाते. मोबाइल अथवा बंदी असलेली कोणतीही वस्तू आढळल्यास केंद्रात प्रवेश नाकारण्याचा अधिकार मतदान केंद्र अधिकाऱ्यांना दिला आहे. मतदान प्रक्रिया, ईव्हीएम, मतदान केलेल्या बोटाची शाई किंवा गोपनीय मतदानाशी संबंधित कोणतेही दृश्य चित्रित करणे हा गंभीर गुन्हा मानला जाणार आहे. त्यामुळे अशा प्रकारचे कोणतेही कृत्य करणाऱ्या संबंधितांवर कायदेशीर कारवाई केली जाईल.

**१०० मीटर परिसरात बंदी**

मतदानाच्या दिवशी मतदान केंद्राच्या १०० मीटर परिसरात मोबाइलसह इतर इलेक्ट्रॉनिक्स गॅझेट वापरण्यास बंदी आहे. मतदान केंद्रात मोबाइल कॅमेरा, स्मार्ट वॉच, ब्लूटूथ हँडसेट, टॅबलेट, पॉवरबैंक, व्हिडिओ रेकॉर्डर मतदान केंद्रात नेण्यास सक्त मनाई आहे.

## केळीचे साल फेकून देताय? थांबा !

### 'हे' पाच ब्यूटी सिक्रेट्स वाचून व्हाल थक्क

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

केळी खाल्ल्यानंतर अनेक जण साल फेकून देतात. मात्र, त्या सालीपासूनही अनेक फायदे आहेत. ते काय ? जाणुन घेऊयात.

सौंदर्यात चाँद- केळीचे साल तुमच्या सौंदर्यात चार चाँद लावू शकते.

**व्हिटॅमिन-सी**

केळीचे साल अँटीऑक्सिडंट्स, व्हिटॅमिन-बी६, व्हिटॅमिन-सी आणि पोटॅशियमचा खजिना आहे, जे त्वचा आणि केसांसाठी अत्यंत फायदेशीर ठरते.

**प्रदूषण**

हे घटक त्वचेला पोषण देतात, हायड्रेट ठेवतात आणि प्रदूषण तसेच सूर्याच्या नुकसानीपासून संरक्षण करतात.

**नॅचरल फेस मास्क**

तुम्ही या सालीचा उपयोग अनेक प्रकारे करू शकता: सालीचा गर घेऊन त्यात तांदळाचे पीठ आणि साखर मिसळून नॅचरल फेस मास्क तयार करता येतो, ज्यामुळे त्वचा मुलायम आणि चमकदार होते.

**डाग आणि पिंपल्स**

पिकलेल्या सालीच्या आतील भागाचा मसाज केल्यास फायन लाइन्स, डाग आणि पिंपल्स कमी होतात.

**डेड स्किन**

टॅनिंग आणि डेड स्किन काढण्यासाठी साल आणि बेकिंग सोडाचा स्क्रब प्रभावी आहे, तर साल आणि कोरफड जेलचा वापर काळे वर्तुळे दूर करण्यासाठी केला जातो.



## तुम्हीच व्हा..! पत्रकार

अनेकांना पत्रकार होण्याची सुप्त इच्छा असते. मात्र त्यासाठी काय करावे ? आपल्याला ते जमेल का ? आपल्याला लिहिता येईल का? सर्वच वृत्तपत्रांनी पुरेशा संख्येत त्यांचे अधिकृत प्रतिनिधी नेमले आहेत मग आपल्याला कोण संधी देईल?

ती संधी आम्ही आपणास उपलब्ध करून देत आहोत. खास करून आपल्या भागातील किंवा अमळनेर विधानसभा मतदारसंघातील कोणतीही समस्या, निधन वार्ता , विवाह वार्ता शक्यतो फोटोसह आम्हास लिहून कळवा. आपल्याला जसे लिहिता येईल तसे लिहा. त्यास आम्ही बातमीचे स्वरुप देऊ. त्याखाली वाचक पत्रकार म्हणून आपले नावही प्रसिद्ध करू. आपले नाव गोपनीय ठेवावे अशी आपली इच्छा असल्यास आपले नाव प्रसिद्ध केले जाणार नाही. बातमी चांगली असल्यास आपल्या फोटोसह प्रसिद्ध करू. आपणास लिहिण्याची इच्छा नसल्यास काही विषयांवर आम्हीच लिहावे, त्यास व्यापक प्रसिद्धी द्यावी असे आपणास वाटत असल्यास आम्हास आपण आपल्या मतदारसंघातील विषय ही सुचवू शकता. चला तर मग होऊया आपण पत्रकार. फोडू या समस्यांना वाचा. देऊयात चांगल्या कार्यांना प्रसिद्धी.

**बातमीसाठी संपर्क :**
रजनीकांत पाटील : 8788441234
योगेश महाजन : 9850576058
भरत पाटील : 9922408434

**जाहिरातीसाठी संपर्क :**
शरद कुलकर्णी: 9922547800
रजनीकांत पाटील : 8788441234

# प्रा. अशोक पवार राज्यस्तरीय संविधान पुरस्काराने सन्मानित

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



जळगाव येथे यशोदा सभागृहात २९ व ३० नोव्हेंबर २०२५ रोजी झालेल्या राज्यस्तरीय सन्मान संमेलनात प्रा. अशोक पवार अमळनेर यांना संविधान सन्मान पुरस्काराने गौरविण्यात आले. हा पुरस्कार ज्येष्ठ साहित्यिक उत्तम कांबळे कवी संपत सरल व न्यायमूर्ती बीजी कोळसे- पाटील यांच्या हस्ते देण्यात आला.

मुकुंद सपकाळे संविधान संविधानाचे मुख्य संयोजक होते. डॉ. करीम सालार स्वागताध्यक्ष होते. पाच हजार रुपये व स्मृतिचिन्ह सन्मानपत्र बुके असे पुरस्काराचे स्वरूप होते. प्रा. अशोक पवार यांनी पुरस्कार समयी मिळालेले पाच हजार रुपये संविधान जागर कार्यासाठी डॉ. मिलिंद बागुल यांच्याकडे सुपूर्द केले. महाराष्ट्रातील चार सन्मानार्थींमध्ये नागपूर, संभाजीनगर व अमळनेरच्या प्रा. अशोक पवार यांचा समावेश होता.

**प्रा. अशोक पवारांचे कार्य**


प्रा. अशोक पवार २०२० पासून महापुरुषांच्या विचारांचा प्रचार व प्रसार करण्यासाठी अमळनेर, पारोळा, धरणगाव येथे कार्यशाळेचे आयोजन करतात. महापुरुषांच्या कार्यकर्तृत्वाबद्दल वाचन साहित्य विनामूल्य देण्यात येते. महापुरुषांच्या जयंतीदिनी एकाच दिवशी शंभर व्याख्याने आयोजित केली जातात. आतापर्यंत जळगाव जिल्ह्यात बाल, युवा व ज्येष्ठ वक्ते मोठ्या प्रमाणावर तयार झाले आहेत. वरील उपक्रम नियमित सुरू आहे.

२६ जानेवारी २०२५ पासून सोशल मीडियावर संविधानाच्या विविध विषयांवर अभ्यासपूर्ण, ७५ पेक्षा जास्त आकर्षक पोस्ट तयार करून प्रबोधनासाठी प्रसारित करण्यात आल्या. हजारो नागरिकांपर्यंत संविधानिक मूल्यांविषयी जनजागृती झाली. १६ मार्च २०२५ रोजी एरंडोल येथे आयोजित केलेल्या संविधान सन्मान परिषदेच्या आयोजनात सक्रिय सहभाग व जिल्हास्तरीय संविधान मूल्य जनजागृती पुरस्कार प्राप्त झाला. १८ व १९ जून २०२५ पुणे येथे आयोजित संविधान जागर अभियान शिबिरात सक्रिय सहभाग. २६ व २७ जुलै २०२५ रोजी जळगाव येथे धनाजी नाना समाजकार्य महाविद्यालयात दोन दिवशी शिबिराचे आयोजन करण्यात आले. त्या शिबिरात जळगाव, धुळे, नंदुरबार जिल्ह्यातील ३२५ पेक्षा जास्त महिला, पुरुष, युवा वर्गाने सहभाग घेतला. मुख्य आयोजक म्हणून प्रा. अशोक पवार यांचा सक्रिय सहभाग होता. ऑगस्ट २०२५ मध्ये संविधानावर आधारित पाच विषयांवर वक्ते तयार करून एक दिवसांची मोफत कार्यशाळा घेण्याचे नियोजन केले असून, धनदाई महाविद्यालय अमळनेर येथे कार्यशाळा संपन्न झाली. पंडित जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालय अमळनेर व साने गुरुजी विद्यालयात व अन्य शैक्षणिक संस्थांमध्ये संविधान जागर अभियानचे कार्यक्रम झाले. प्रा. अशोक पवार अध्यक्ष असलेल्या युवा क्रांती सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालयात भारताचे संविधान व संविधानावर आधारित विविध पुस्तके वाचकांसाठी उपलब्ध आहेत. अभ्यासकांना विनामूल्य अभ्यासिका उपलब्ध करून दिली आहे. वारसा वारकरी संतांचा या पुस्तिकेच्या ५०० प्रती गरीब विद्यार्थ्यांना वस्तीत जाऊन विनामूल्य वाटण्यात आल्या. याचा सर्व खर्च अशोक पवार यांनी केला.

# एचएसआरपी नंबर प्लेटसाठी मुदत वाढविली

## राज्यात कोट्यवधी गाड्यांवर अजूनही प्लेट नाही

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**




हाय-सिक्युरिटी नंबर प्लेट (एचएसआरपी) ज्यांनी बसविलेल्या नाहीत, त्यांच्यासाठी परिवहन विभागाने पुन्हा एकदा अंतिम मुदत वाढवून दिली आहे. या नंबर प्लेट लवकरात लवकर लाऊन घ्याव्यात, असे आवाहन परिवहन विभागाने केले आहे. ३१ डिसेंबरपर्यंत ही मुदतवाढ देण्यात आली आहे. विभागाने मुदत वाढवण्याची ही पाचवी वेळ आहे.

या मुदतवाढीनंतरही अनेक प्रश्न उभे राहिले आहेत. एकट्या पुणे शहरातच १५ लाखांहून अधिक वाहनांवर एचएसआरपी नंबर प्लेट बसवणे बाकी आहे. त्यामुळे केवळ एका महिन्यात एवढ्या मोठ्या संख्येने नंबर प्लेट्स बसविता येतील का? हा मोठा प्रश्न आहे.

उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार, १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या सर्व जुन्या वाहनांवर हाय-सिक्युरिटी नंबर प्लेट बसविणे बंधनकारक आहे. या नंबर प्लेटमुळे अपघात किंवा गुन्हेगारीत सामील असलेल्या वाहनांना सहज ओळखता येते. त्यामुळे सर्व वाहने सुरक्षित राहतील आणि गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्यास मदत होईल, असे मानले जाते. एचएसआरपी मध्ये असलेले खास सिक्युरिटी फीचर्स आणि होलोग्राममुळे नंबर प्लेटची डुप्लिकेट कॉपी बनविणे जवळजवळ अशक्य होते. या योजनेची अंमलबजावणी महाराष्ट्रात १ एप्रिल २०१९ होऊनही नागरिकांनी त्याकडे दुर्लक्ष केल्याचे दिसून येते. आतापर्यंत सुमारे साडेसात लाख वाहन मालकांनी एचएसआरपी बसवली आहे, तर सुमारे साडेदहा लाख मालकांनी नोंदणी केली आहे. पुण्यात २५ लाखांहून अधिक वाहनांना एचएसआरपी आवश्यक आहे.

### ३१ डिसेंबरनंतर काय? दंड लागणार

परिवहन विभागाने अनेकवेळा मुदतवाढ देऊनही नागरिकांनी याकडे लक्ष दिले नाही. आता, ज्या वाहनांवर एचएसआरपी नाही, त्यांची कोणतीही कामे आरटीओमध्ये होत नाहीत. वाहन मालकांना त्वरित एचएसआरपी बसविण्याचे आवाहन केले आहे. ३१ डिसेंबरनंतर एचएसआरपी नसलेल्या वाहनांवर मोठा दंड आकारला जाईल.


पूर्वी नोंदणी झालेल्या २.१० कोटी जुन्या वाहनांना एचएसआरपी आवश्यक आहे. यापैकी ९० लाख वाहनांनी एचएसआरपीसाठी नोंदणी केली आहे. आतापर्यंत केवळ ७३ लाख वाहनांवर एचएसआरपी बसवण्यात आल्या आहेत. परिणामी, अजूनही सुमारे ६५ टक्के वाहनांवर एचएसआरपी बसवलेली नाही.

**मुदतवाढीची मागणी का झाली?**

राज्यातील वाहन मालक आणि प्रतिनिधी फेडरेशनचे अध्यक्ष बाबा शिंदे यांनी मुदत वाढवण्याची मागणी केली होती. एखादी नंबर प्लेट तुटल्यास किंवा खराब झाल्यास चालकाला दोन्ही नंबर प्लेट्स नव्याने विकत घ्यावी लागते. मोठ्या संख्येने वाहनांना नंबर प्लेट बसवण्यासाठी पुरेसा वेळ मिळत नव्हता. यापूर्वी ही अंतिम मुदत ३० एप्रिल, ३० जून, १५ ऑगस्ट आणि ३० नोव्हेंबरपर्यंत वाढवण्यात आली होती. आता ती पुन्हा ३१ डिसेंबर करण्यात आली आहे.

ग्लोबल महातेज
आजच...! आपली जाहिरात बुक करा
दैनिक ग्लोबल महातेज उपलब्ध करून देत आहे आपणास
'चमकण्याची' तसेच आपली व्यक्तिगत, राजकीय, व्यावसायिक प्रसिद्धी जाहिरात रूपाने प्रचंड मोठ्या प्रमाणावर करण्याची सुवर्णसंधी...!





रोज साडेतीन हजार पेपरचा खप असलेले ब्रॉडशिट आकारातील चारही पाने रंगीत असलेले महाराष्ट्रातील एकमेव वृत्तपत्र ...!!
डिजिटल पेपरच्या सहाय्याने लाखो लोकांपर्यंत पोहोचणारा अफलातून पेपर...!!!

**जाहिरात दर**

| | | |
|---|---|---|
| १) | पूर्ण पान | 45,000/- रु. |
| २) | अर्ध पान | 25,000/- रु. |
| ३) | पाव पान (16 x 25 सें. मी.) | 13,000/- रु. |
| ४) | 16 x 13 सें. मी. | 7,000/- रु. |
| ५) | 12 x 10 सें. मी. | 4,000/- रु. |
| ६) | 8 x 10 सें. मी. | 2,500/- रु. |
| ६) | ३ वर्षांखालील बाळाचा वाढदिवस | 200/- रु. |
| ७) | शुभविवाह जाहिरात ( वधू-वराच्या रंगीत फोटोसह ) | 300/- रु. |
| ८) | लिगल नोटीस | 150/- रु. |
| ९) | उठावणा जाहिरात | मोफत |

* फ्रंट पेज साठी जाहिरात २०% जादा दर असेल. * शेवटच्या पानासाठी १०% जादा दर असेल.

जाहिरात बुकिंगसाठी संपर्क
शरद कुलकर्णी : 99225 47800/95271 08678
रजनीकांत पाटील : 87884 41234
वरील सर्व दरांत नियमित जाहिरातदारांना विशेष सवलत मिळेल व बातम्यांच्या स्वरूपात मोठी प्रसिद्धी मिळेल.




# भौम प्रदोष : मंगळवारच्या शिवपूजेचा पवित्र सोहळा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतीय सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परंपरेत ‘ प्रदोष ’ हा अत्यंत महत्त्वाचा धार्मिक दिवस मानला जातो. प्रत्येक पंधरवड्यातील त्रयोदशी तिथीच्या सायंकाळी साजरा होणारा हा दिवस भगवान शिव यांच्या उपासनेला अर्पण केलेला असतो. परंतु त्रयोदशीचा दिवस जर मंगळवारी आला, तर त्यास ‘ भौम प्रदोष ’ म्हणतात. ‘ भौम ’ म्हणजे मंगळग्रह, जो उर्जेचा, शौर्याचा आणि आरोग्याचा अधिष्ठाता मानला जातो. शिवपूजेच्या पवित्रतेसोबत मंगळाच्या शक्तीचा संयोग झाल्यामुळे भौम प्रदोषाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.



### भौम प्रदोषाचे धार्मिक महत्त्व

पुराणांनुसार प्रदोषकाळ हा भगवान शिव आणि देवी पार्वती प्रसन्न असतात, असा कालखंड मानला जातो. यावेळी केलेली उपासना विशेष फलदायी ठरते. विशेषतः भौम प्रदोषाविषयी मान्यता आहे, की व्यक्तीचे शारीरिक व मानसिक आरोग्य सुधारते. मंगळदोष अथवा कुंडलीतील पापग्रहांचा प्रभाव कमी होतो. कर्जमुक्ती, धैर्य आणि कार्यसिद्धीची प्राप्ती होते. दाम्पत्य जीवनातील मतभेद शमण्यास मदत होते. मंगळ हा ग्रह रक्त, धैर्य, यश, पराक्रम आणि अग्नितत्त्वाचा अधिपती असल्याने या दिवशी शिवपूजा केल्यास मंगळाशी निगडित अडथळे दूर होतात, अशी मान्यता आहे.

### पौराणिक संदर्भ

शिवपुराण, पद्मपुराण आदी ग्रंथांत प्रदोषकाळात केलेल्या शिवपूजेचे महत्त्व वर्णिले आहे. एक कथा विशेष प्रसिद्ध आहे, की आसुरांनी छळलेल्या देवतांनी भगवान शिव यांची आराधना प्रदोषकाळात केली आणि भगवान शंकरांनी त्यांना तारकासुरापासून मुक्त केले. यावरून प्रदोष कधीही संकटमोचनाचा, रक्षा करणारा काळ मानला जातो.

### चंद्र, सूर्य आणि मंगळ यांचा संयोग

प्रदोष हा चंद्रपंचांगानुसार येत असल्याने त्याचा संबंध चंद्राच्या कलांशी असतो. मंगळवारी त्रयोदशी हा दिवस येणे ही ग्रहांच्या गतिसंयोगातून निर्माण होणारी विशेष घटना आहे. त्यामुळे चंद्राच्या शांत उर्जेला मंगळाच्या तेजस्वी उर्जेचा आधार मिळतो. त्रयोदशीच्या सायंकाळी शिवतत्त्व प्रबळ होते. या तिन्हींचा संगम भक्तांसाठी शुभदायक व फलदायी मानला जातो.

### भौम प्रदोष उपासनेची पद्धत

भौम प्रदोषाच्या दिवशी खालील विधी प्रचलित आहेत.

**१) उपवास :** या दिवशी अनेक भक्त उपवास करतात. फलाहार, पाण्याचा उपवास किंवा निर्जल उपवासही केले जातात. **२) स्नान व शुचिर्भूतता :** प्रदोषकाळ सुरू होण्यापूर्वी स्नान करून मंदिरे किंवा घरातील देवघर सजविले जाते. **3) प्रदोषकाळी पूजन :** प्रदोषकाळ साधारण सूर्यास्ताच्या १ तास आधी ते १ तास नंतर असतो. यावेळी शिवलिंगावर जलाभिषेक, पंचामृताभिषेक, बिल्वपत्र, धोतरा, आकडे फूल अर्पण करावे. दीपदान, ‘ ॐ नमः शिवाय ’ मंत्रजप ही उपासना केली जाते. **४) शिवपार्वती परिक्रमा :** प्रदोषाच्या दिवशी परिक्रमा विशेष मृदू पद्धतीने ‘ अर्धचंद्राकार ’ केली जाते. ज्याचे प्रतीक चंद्राकार प्रदोषकाळाशी संबंधित आहे. **५) मंगळाच्या शांतीसाठी उपाय :** मंगळाचे अधिपती कार्तिकेयांचे (स्कंदाचे) नामस्मरण करावे. रुद्राभिषेक, हनुमान चालीसापठण हे उपायही पारंपरिकरित्या केले जातात.

### आधुनिक काळातील भौम प्रदोषाचे महत्त्व

आजच्या ताणतणावपूर्ण जीवनात शरीर आणि मनाला संतुलित ठेवण्यासाठी भक्ती हा एक मोठा आधार आहे. भौम प्रदोषाच्या उपासनेमुळे मानसिक शांती, आरोग्याबद्दल सकारात्मकता, आत्मविश्वासात वाढ, कौटुंबिक संबंधांमध्ये सौहार्द यांचा अनुभव अनेक भक्तांना मिळतो. विशेषतः संघर्ष, धैर्य आणि कार्यक्षमता वाढविण्यासाठी हा दिवस उत्तम मानला जातो.

# जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांचे अनमोल विचार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

एकाच गोष्टीवर लक्ष केंद्रित केल्यास ते पूर्ण होते, हा यशाचा मंत्र आहे. वडाचे बीज अतिशय सूक्ष्म असते. ते एखाद्या खडकाच्या फटीत रुजते. हळूहळू वाढत जाते. त्याच्या वाढीबरोबर खडकातील फट वाढत जाते. एक दिवस तो खडक फुटतो. एरव्ही दगडी चिरा दोर कापतो. पण त्याच चिरेवर विशिष्ट पद्धतीने दोर घासला तर ती चिराही झिजते. विष प्राणघातक असते. मात्र अत्यंत सूक्ष्म प्रमाणात घेत-घेत जे सवय करतात ते नंतर विषही पचवू शकतात. आईच्या उदरात नऊ महिन्यांच्या बाळाला बसण्याइतकी जागा नसते. पण एकदा गर्भधारणा झाली की तो सूक्ष्म गर्भ हळूहळू स्वतःला जागा करून घेतो. तसेच तुम्हाला एखादी गोष्ट साध्य करायची असेल तर त्यासाठी तुम्ही सातत्याने प्रयत्न करा. कर्मकांडातून काहीही साधत नाही. एवढासा गर्भ जर स्वतःला जागा करून घेत असेल, तर तुम्हाला या जगात स्वतःचे स्थान निर्माण करणे काय अशक्य आहे. अभ्यासाने जर विषही पचवता येत असेल, तर जीवनातील अपयश का पचवता येणार नाही. अतिशय नाजूक असणारे ओले मूळ जर खडक फोडू शकत असेल तर बिकट परिस्थितीवर मात करणे कठीण ते काय? दोराने जर दगडी चिरा कापला जात असेल, तर जीवनातील अडथळ्यांवर मात करणे अशक्य ते काय? म्हणून नशीब, प्राक्तन, दैववाद यांच्या नादी न लागता प्रयत्नांचीच कास धरली पाहिजे, असे संत तुकोबाराय सांगतात.

**‘ ओले मूळ भेदी खडकाचे अंग । आभ्यासासी सांग कार्यसिद्धी ॥’** या शब्दात अभ्यासपूर्वक, सातत्याने निश्चय केलेला माणूस आपले ध्येय साध्य करू शकतो, असा तुकोबाराय विश्वास जागवतात. शहाजी महाराजांनी स्वराज्याचा संकल्प केला आणि छत्रपती शिवरायांनी तो पूर्ण केला. शहाजी महाराज आणि जिजाऊ साहेबा यांनी आपल्या या पुत्राच्या मनात स्वराज्याचे बीज रुजवले, तेव्हा याचे परिणाम काय होऊ शकतील याची त्यांना कल्पना नव्हती असे नाही. शहाजी महाराजांच्या आणि जिजाऊंच्याही अनेक पिढ्या सैनिकी पेशातच होत्या. स्वतंत्र राज्य निर्माण करण्याची काय किंमत द्यावी लागू शकते, प्रस्थापित मोगल, निजाम, आदिलशहा यांच्याविरोधात बंड केले तर काय किंमत द्यावी लागते याचा त्यांना चांगलाच अनुभव होता. व्यावहारिक विचार केला तर सुमारे तीनशे वर्षांत स्वतंत्र राज्य स्थापन करण्याची कल्पनाही कोणी केली नव्हती आणि हिंमतही केली नव्हती.

आपला जीव, जहागिऱ्या, सरदारक्या, आपली धनदौलत, गुलामगिरीतील मानसन्मान जपावा, या पलीकडे कोणताही उच्च विचार वा ध्येय कोणाकडेच नव्हते. स्वतःचा निजीस्वार्थ या पलीकडे कोणतीही प्रेरणा नव्हती. सामान्य रयतेला सुखाने, समाधानाने आणि इज्जतीने जगता येईल, असे स्वराज्य निर्माण करण्याचा ध्यास घेतला. स्वराज्याचे स्वप्न पाहिले. त्या स्वप्नाचा अथक, अविरत पाठलाग केला. जिजाऊंनी त्यासाठी आपल्या प्रिय पतीचा प्रदीर्घ विरह सहन केला. स्वतःला आणि आपल्या प्रिय पुत्राला भयंकर असुरक्षिततेच्या गर्तेत झोकून दिले. स्वराज्याच्या दिव्य उदात्त ध्येयासाठी आपले तन, मन, धन पणाला लावले. शिवरायांच्या आधीही आणि नंतरही शेकडो सरदार होते आणि होऊन गेले. पण शिवराय सामान्य सरदार झाले नाहीत, ते युगपुरुष ठरले. तुकोबारायांच्या भाषेत सांगायचे तर **‘ आणिक संकल्पा नको गोऊ मन । तरीच कारण साध्य होय ॥ ’**

अनेक संकल्पांमध्ये मन गुंतवू नका, असे केले तरच ध्येय साध्य होईल. मनाला अनेक नवीन आणि वेगळ्या संकल्पांमध्ये गुंतवू नका. कारण यामुळे तुमचे मुख्य ध्येय साध्य होण्यात अडथळे येतात. जेव्हा तुम्ही मनाला एकाच ध्येयावर केंद्रित ठेवाल तेव्हाच ते कारण (ध्येय) पूर्ण होऊ शकेल. नाही तर आपल्याकडे म्हण आहे ‘ एक धड ना भाराभर चिंध्या ’ असे होईल. म्हणून अनेक संकल्पांमध्ये मन गुंतवू नका. एकाच संकल्पावर लक्ष केंद्रित करून ते पूर्ण करण्यासाठी त्याच्याकडे लक्ष पुरविणे हा यशाचा मंत्र आहे.

**– जय जगद्गुरू तुकोबाराय**





## व्यक्तीला नरकाच्या दारात नेणाऱ्या या तीन वाईट प्रवृत्ती

### श्रीमद्भगवद्गीतेतील श्लोकात दडलेले रहस्य

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

श्रीमद्भगवद्गीतेमध्ये भगवान श्रीकृष्णांनी अशा तीन दुष्प्रवृत्तींचा उल्लेख केला आहे, की ज्या मनुष्याच्या पतनाचे कारण ठरू शकतात. गीता उपदेशानुसार या तिन्ही प्रवृत्ती मनुष्याला विनाशाकडे घेऊन जातात. त्यामुळे या गोष्टींपासून दूर राहणे आवश्यक मानले आहे. चला याबद्दल सविस्तर जाणून घेऊया.

भगवान श्रीकृष्णांनी अर्जुनाला दिलेला गीतेचा उपदेश हा सर्वोच्च ज्ञान मानला जातो. गीतेतील प्रत्येक शब्द श्रीकृष्णांच्या श्रीमुखातून प्रकट झालेला आहे. त्यामुळेच या ग्रंथाला हिंदू धर्मात अत्यंत पवित्र आणि महत्त्वाचे स्थान प्राप्त आहे. आज आपण गीतेनुसार अशा तीन प्रवृत्ती जाणून घेणार आहोत. ज्या पापाच्या श्रेणीत मोडतात आणि मनुष्याला अधोगतीकडे ढकलतात.

**गीतेतील श्लोक**

**त्रिविधं नरकस्येदं द्वारं नाशनमात्मनः ।**
**कामः क्रोधस्तथा लोभस्तस्मादेतत्त्रयं त्यजेत् ॥**

या श्लोकात भगवान श्रीकृष्ण सांगतात, की काम, क्रोध आणि लोभ ही तीन नरकाची द्वारे आहेत. या प्रवृत्ती आत्म्याचा नाश करतात. त्यामुळे मनुष्याने या तिन्हींचा त्याग करणे हेच कल्याणकारक आहे.

**या तीन प्रवृत्ती मनुष्याला कशाप्रकारे विनाशाकडे नेतात?**

**१) काम (वासना/अनियंत्रित इच्छा)**

काम म्हणजे मनातील अनियंत्रित वासना किंवा अतिरेकी आसक्ती. गीतेनुसार ही प्रवृत्ती मनुष्याला नरकाच्या दिशेने नेते. यामुळे–

- मनातील लोभ आणि आसक्ती वाढू लागतात.
- वासना प्रबळ झाल्यास मनुष्य पापाचे आचरण करू लागतो.
- अनियंत्रित इच्छा मनुष्याला विवेकहीन बनविते.

म्हणूनच गीतेनुसार काम मनुष्याच्या अधोगतीचे कारण ठरते.

**२) क्रोध (राग)**

- क्रोध मनुष्याच्या विवेकबुद्धीचा नाश करतो.
- क्रोधात मन भ्रमित होते.
- विचारशक्ती मंदावते.
- निर्णयक्षमता कमी होते.
- रागाच्या भरात मनुष्य चुकीच्या कृती किंवा हिंसा करतो.
- अशा कृतींचा दुष्परिणाम आयुष्यावर खोलवर उमटतो.

म्हणूनच क्रोध मनुष्याच्या विनाशाचे एक मोठे कारण मानले गेले आहे.

**३) लोभ (लालसा/लालच)**

लोभ म्हणजे न संपणारी इच्छा. गीतेमध्ये श्रीकृष्ण अर्जुनाला सांगतात–

- मनुष्याला कितीही मिळाले तरी तो कधी समाधान पावत नाही.
- मिळविण्याची लालसा वाढत जाते
- लोभामुळे मनुष्य अधर्माच्या मार्गावर चालू शकतो.

म्हणूनच लोभ हा पतनाचा आणि विनाशाचा मार्ग मानला गेला आहे.

## देवतेच्या ९ वाहनांचा अर्थ

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**१) सिंह :** देवी दुर्गा यांचे वाहन, सिंह, शक्तीचे प्रतीक आहे. दुर्गा यांचे उपासक शक्तिशाली आणि शत्रूंचा सामना करण्यास सक्षम आहेत.
**२) हंस :** देवी सरस्वती यांचे वाहन हंस आहे. मोती युग हे त्यांचे वैशिष्ट्य आहे. या गुणांचा अवलंब केल्याने व्यक्ती ब्रह्माचे स्थान प्राप्त करते.
**३) वाघ :** ते जोम आणि सतत कृतीचे प्रतीक आहे. म्हणून विशिष्ट स्वरूपात देवी माता वाघावर स्वार होते.
**४) वृषभ :** बैल ब्रह्मचर्य आणि संयमाचे प्रतीक आहे. ते शक्ती आणि सकारात्मक ऊर्जा प्रदान करते. म्हणून केवळ देवी शैलपुत्रीच नव्हे, तर भगवान शिव देखील नंदीवर स्वार होतात.
**५) गरुड :** जेव्हा देवी लक्ष्मी भगवान नारायणांसोबत प्रवास करतात तेव्हा त्या भगवान विष्णूंचे वाहन गरुडावर स्वार होतात. गरुड हा त्याग आणि अलिप्ततेचे प्रतीक आहे. तो पक्ष्यांचा राजा मानला जातो.
**६) मोर :** भगवान कार्तिकेय यांची परम शक्ती, कार्तिकेय मोरावर विराजमान आहेत. मोर हे सौंदर्य, कृपा, स्नेह आणि योगिक शक्तीचे प्रतीक आहे.
**७) घुबड :** देवी लक्ष्मी यांचे वाहन घुबड हे आध्यात्मिक अंधत्वाचे प्रतीक आहे. सांसारिक जीवनात धनाच्या मागे धावणारी व्यक्ती म्हणजेच लक्ष्मी यांना आत्मज्ञानाचा सूर्य पाहू शकत नाही.
**८) गाढव :** हे तमोगुण (अंधार) चे प्रतीक आहे. म्हणून देवी कालरात्री यांनी ते त्यांचे वाहन म्हणून निवडले. देवी शीतला यांचे वाहन देखील गाढव आहे.
**९) हत्ती :** देवी विविध रूपांमध्ये हत्तीवर बसतात. तंत्रशास्त्रानुसार देवी यांचे एक नाव गजलक्ष्मी आहे.

## वास्तव ...

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**


एकदा एक व्यक्ती रमण महर्षी यांच्याकडे आली. ती व्यक्ती रमण महर्षींना म्हणाली, की मी अद्वैतवादी नाही. तुम्ही प्रत्येकाला एकच सांगता, की मी कोण आहे हे शोधून काढ. परंतु मी तर भगवान विष्णूंचा भक्त आहे. तर मी तुमच्या पद्धतीप्रमाणे कोण आहे याचा विचार न करता फक्त भगवान विष्णूंची भक्ती केली तर चालेल का?

रमण महर्षी म्हणाले हो.

मग मेल्यानंतर मी वैकुंठात जाईन का?
रमण महर्षी म्हणाले, की हो. का नाही जाणार ?
मग माझ्याशी प्रत्यक्ष विष्णू बोलू शकतील का ?
हो, विष्णू तुझ्याशी बोलतील.

अरे वा, ते माझ्याशी काय बोलतील ?
रमण महर्षी म्हणाले, की भगवान विष्णू हेच सांगतील मी म्हणजे कोण हे शोधून काढ.

थोडक्यात मी म्हणजे कोण? हे शोधून काढणे हे कोणत्याही मार्गाचे शेवटचे ध्येय आहे. असे रमण महर्षींना सांगायचे असावे. मग तो भक्तीमार्ग असो किंवा राजयोगाचा मार्ग असो.



आता आपण मुख्य विषयाकडे वळू.

तिसऱ्या भागाकडे डायरेक्ट जाण्याआधी आपण फक्त थोडीशी उजळणी करण्याचा प्रयत्न करू. म्हणजे लिंक लवकर लागू शकेल.
अद्वैत वेदांतानुसार तीन प्रकारच्या रिॲलिटी असतात.
१) स्वप्नावस्था
२) जागृत अवस्था
३) तुर्या अवस्था

यापैकी आपण नेहमी स्वप्न किंवा निद्रावस्था आणि जागृतावस्था यामध्ये जगत असतोच. निद्रा अवस्थेमधील किंवा स्वप्नामधील भीती किंवा दुःख हे आपण जागे झालो की क्षणामध्ये नष्ट होऊन जातात. जागृत अवस्थेमधील आपण दैनंदिन जीवनामध्ये जे काही दुःख किंवा भीती अनुभवत असतो ती आपल्याला कशी बरे नाहीशी करता येईल? त्याकरिता तिसऱ्या वास्तवाचा विचार केलेला आहे. हे एकप्रकारचे तिसरे डायमेन्शन म्हटले तरी चालेल. तर या डायमेन्शनमध्ये करण्याकरिता तीन स्टेप्स सांगितलेल्या आहेत.

१) श्रवण
२) मनन
३) निधीध्यास

यापैकी श्रवण म्हणजे ज्ञानी अशा गुरूंकडून सत्य वचन ऐकत राहणे. अद्वैत वेदांताचा बेस हा मुळात या एका वाक्यावर आहे ते वाक्य म्हणजे अहम ब्रह्मस्मी किंवा ब्रह्मे. एकच सत्य आहे बाकी सर्व मिथ्या. ब्रह्म हे एकमेव सत्य. गुरूने कोणत्याही प्रश्नाला दिलेल्या उत्तरामुळे मेंदूचे समाधान होते किंवा बुद्धीचे समाधान होते, असे वाटू शकेल. परंतु त्यामुळे मी म्हणजेच ब्रह्म आहे हीच स्थिती अनुभवता कसे बरे येईल ? खरेतर अद्वैत वेदांत हा सगळ्यात सोपा आणि सहज मार्ग. ज्यामध्ये प्रत्यक्ष ध्यानधारणा किंवा जप-तप याची खरी गरज लागत नाही. कारण प्रत्येक दुःखाचे मूळ हे अज्ञान असते. जर ते अज्ञान दूर करून ज्ञान मिळविले तर आपोआप दुःखाचे निराकरण झालेले असते.

समजा मला माझ्या आयुष्यात प्रचंड दुःख झाले आहे. माझी आवडती व्यक्ती मला सोडून गेली किंवा माझा उद्योगधंदा बुडून गेला आणि गरिबी आली किंवा अशा अनेक प्रकारे मी दुःखी झालेलो आहे. तर यावरील उत्तर हे असेल का? की मला सोडून गेलेली व्यक्ती मला परत मिळाली किंवा माझा बुडलेला धंदा व्यवस्थित चालू लागला. त्यामुळे त्यात पुरते दुःखाचे निवारण होईल. परंतु कायमस्वरूपी दुःखाचे निवारण शक्य आहे का ?

तर नाही. परंतु जर हे लक्षात आले, की ज्याप्रमाणे स्वप्नांमध्ये आपण जे धन मिळवितो किंवा एखादी प्रिय वस्तू मिळवितो. मात्र स्वप्नातून जागे झाल्याबरोबर ते सर्वजण आणि ती वस्तू आपल्यापासून नाहीशी झालेली असते. म्हणजेच आपल्याला ज्ञान झालेले असते की जे काही आपण बघत होतो ते सत्य नव्हते. तसेच ज्ञान जर आपल्याला या जागृत जगामध्ये झाले, तर समोरील परिस्थिती बदलणार नाही. परंतु त्यामुळे दुःख मात्र होणार नाही.

अद्वैत वेदांत हे सांगत नाही, की तुमच्यावर वाईट प्रसंग येणार नाही किंवा संकट येणार नाही. ते जशी यायची आहेत तशीच येतील. प्रचंड वाईट गोष्टी घडतील देखील. परंतु त्याचा तुमच्या समाधानावर आणि आनंदावर कोणताही फरक पडणार नाही याची शाश्वती अद्वैत वेदांत देतो.

ज्याप्रमाणे आपण जागे असताना स्वप्न काय पडणार आहे त्याला फारसे घाबरत नाही, वाईट स्वप्न जरी पडले तरी देखील आपण त्याची फारशी चिंता करत नाही. आपल्याला दुःख होते ते अज्ञानामुळे. जर हे समजले की मी म्हणजे ब्रह्म आहे. म्हणजेच ज्ञान मिळाले की त्यानंतर दुःखाचे कारण राहणारच नाही. गुरूच्या तोंडून फक्त हे ज्ञान ऐकल्यामुळे मी ब्रह्म आहे याची जाणीव प्रत्येकाला होईलच, असे नाही. काही जीव जन्मतःच अत्यंत समजदार व कमी गुंतागुंतीचे असतील. त्यांना ही गोष्ट गुरूने सांगितल्या- सांगितल्या काही वेळात लक्षात येईल व त्याची जाणीवही होईल. परंतु आपल्यासारख्या सर्वसामान्य माणसांना याची जाणीव लगेच होत नाही.

### मनन

मनन म्हणजे काय ?
गुरूकडून ज्ञान ऐकल्यानंतर त्यावर विचार करणे. जे आपल्या बुद्धीला पटले आहे त्याला आतपर्यंत घेऊन जाणे. परंतु बुद्धीला पटलेल्या गोष्टी अनुभवायला येत नसल्यामुळे मनाला पटतील असे नाही. त्याचे कारण काय ? आता आपण याचा शोध स्टेप-बाय-स्टेप घ्यायला सुरूवात करू. कोणतीही गोष्ट आपल्याला अनुभवास येऊ शकते ते फक्त त्या वेळेला. जेव्हा आपली एकाग्रता अत्युच्च पातळीची असेल. गुरू जे काही सांगत आहेत त्या गोष्टीवर शंभर टक्के एकाग्रचित्त असेल तर त्याची जाणीवही त्या क्षणी होईल. परंतु आपले चित्त हे बऱ्याच गोष्टींमध्ये विखुरलेले असते. त्यामुळे गुरू यांनी सांगितलेले ज्ञान मी म्हणजे प्रत्यक्ष ब्रह्म आहे हे बुद्धीला थोडे फार पटले. तरी देखील मनावरील असलेल्या अनेक कशामुळे ते सरळसोट आतपर्यंत जात नाही. यालाच दोष असे म्हणतात. याला विक्षेप असे नाव संस्कृतमध्ये आहे.

### विक्षेप म्हणजे काय ?

गुरूने आपल्याला ज्ञान दिले तरीदेखील ते मनाच्या वर पर्यंतच राहणे व आतपर्यंत न जाणे. त्याची जाणीव न होणे. त्याचे कारण आपले चित्त व मन हे कायम विखुरलेले असते. त्यामुळे गुरूने कितीही वेळा सांगितले तरी देखील ते ज्ञान आजपर्यंत पोहोचत नाही.
मग त्यावर शिष्य तक्रार करतो कि मी तुम्ही सांगितलेले ऐकले आहे परंतु ते आजपर्यंत जाणिवेला का येत नाही बरे ?
त्याचे कारण आहे विक्षेप.

चित्त एकाग्र नसणे म्हणजेच विक्षेप या दोषाला कसे घालवावे बरे ? कारण जर का चित्त एकाग्र नसेल तर गुरूकडून तीच गोष्ट हजार वेळा ऐकून किंवा त्याचा विचार करून फायदा होत नाही. मग त्यासाठी आपल्याला चित्त एकाग्र करण्याचा अभ्यास करावा लागतो. म्हणजेच जप किंवा ध्यानधारणा किंवा त्राटक किंवा अन्य काही उपाय. म्हणजेच अद्वैत वेदांत यामध्ये खरेतर या गोष्टींचा उपयोग वरवर दिसून येत नाही परंतु चित्त एकाग्र करण्याकरता मात्र यांचा साधन म्हणून उपयोग करावा लागतो.